# कार्यावली

## सोमवार, दिनांक २५ जुलै, २०११ रोजी दुपारी १.०० वाजता विधान भवन,मुंबई येथे सुरु होणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०११ च्या द्वितीय अधिवेशनाची कार्यावली.

**एक** : सभापतींनी, सभापती-तालिका नामनिर्देशित करणे.

**दोन** : प्रश्नोत्तरे

**तीन** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

**चार** : सन २०११-२०१२ च्या पुरवणी मागण्या सादर करणे व त्यावर चर्चा करणे.

**पाच** : अंदाज समितीचे अहवाल सादर करणे.

**सहा** : सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे.

**सात** : लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे.

**आठ** रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे.

**नऊ** : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**दहा** : पंचायती राज समितीचे अहवाल सादर करणे.

**अकरा** : मंत्र्यांनी कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

**बारा** : शासकीय विधेयक (प्रलंबित)-
विचार, खंडशः विचार व संमत करणे --
सन २०१० चे वि.प.वि.क्रमांक १४ - मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१०

**तेरा** : इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

**चौदा** : शोक प्रस्ताव

**पंधरा** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर अल्पकालीन चर्चा- म.वि.प.नियम ९७ अन्वये

**सोळा** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे मंत्र्यांचे लक्ष वेधणे- म.वि.प.नियम १०१ अन्वये

**सतरा** : अशासकीय विधेयके विचारार्थ (प्रलंबित)-

१) सन २०११ चे वि.प.वि.क्रमांक ३ - महाराष्ट्र इमारत बांधकाम व्यवसायातील कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) विधेयक, २०११. श्री.किरण पावसकर, वि.प.स.यांचे

२) सन २०११ चे वि.प.वि. क्रमांक ४ - बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०११ श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांचे

**अठरा : अशासकीय ठराव (म.वि.प. नियम १०२) --**

### श्री.रामदास कदम यांचा ठराव क्रमांक १,२,३, ४ व ५

(१) ''कोकणातील विशेषतः रत्नागिरी व सिंधुदूर्ग या दोन्ही जिल्हयांमध्ये सर्वात जास्त पाऊस पडतो, सदर पावसाचे पाणी अडवून ते पाणी तसेच कोयना धरणातील पाणी जिल्हयातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी पुरविण्याच्यादृष्टीने शासनाने एक खास कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरेने युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२) ''राज्यातील पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देवून त्याठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व त्यायोगे तेथील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी तसेच यासर्व पर्यटन स्थळांचे महत्व कायम राखण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३) ''कोकणात सिंचनाच्या अपुऱ्या सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नापिकी आणि नुकसान सहन करीत असून अनेक सिंचनविषयक योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेवून कोकणाची सिंचनविषयक प्रगती होण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४) ''कोकणात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत चाललेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठयांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा, व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(५) ''मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठया प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

## श्री.दिवाकर रावते यांचा ठराव क्रमांक ६,७

(६) ''मुंबई उच्च न्यायालयाच्या इमारमधील न्यायाधिशांच्या वापरासाठी असलेल्या प्रवेश द्वारावर "बॉम्बे उच्च न्यायालय" असा नामफलक आहे, मराठी ही महाराष्ट्राची राज्यभाषा असल्यामुळे या नाम फलकामध्ये "बॉम्बे" ऐवजी "मुंबई" असा तातडीने बदल करावा, यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे प्रयत्न करावेत, अशी ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(७) ''मुंबई शहरात रोज हजारोंच्या संख्येने येणारे परप्रांतीयांचे लोंढे, परिणामी मुंबई शहरातील कायदा व सुव्यवस्था बिघडून मोठया प्रमाणात निर्माण होणाऱ्या विविध समस्या लक्षात घेता मुंबई शहरात येणारे परप्रांतीयांचे लोंढे रोखण्यासाठी शासनाने तातडीने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

## डॉ.दिपक सावंत यांचा ठराव क्रमांक ९,१०

(९) ''राज्यात रस्ते अपघातात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. अपघातग्रस्तांना वेळीच व योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई- गोवा (वडखळ नाका) नाशिक शिर्डी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या जास्त वाहनांची वर्दळ असलेल्या द्रुतगती मार्गावर शासनाने ट्रॉमा केअर सेंटर सुरू करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०) ''राज्यातील रुग्णांना भासणारी रक्ताची निकड आणि रक्तदानाचे महत्व विचारात घेवून सामाजिक बांधिलकी म्हणून रक्तदान होणे गरजेचे आहे. यासाठी रक्त संक्रमण परिषदेने फक्त रक्तदान दिवस साजरा करणे एवढे मर्यादित कार्यक्रम न ठेवता परिषदेने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी शासनाने विशेष निधी दयावा व त्यासाठी विशेष समिती नेमून यांचे नियंत्रण करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे ''

## श्री.परशुराम उपरकर यांचा ठराव क्रमांक १२,१३,१४ व १६

(१२) ''सिंधुदूर्ग जिल्ह्यातील सिंधुदूर्ग व विजयदूर्ग हे दोन्ही किल्ले व त्यांच्या तटबंदीवर केंद्राच्या पुरातन खात्याची मालकी असल्याने व किल्ल्याच्या आतील जमिन खाजगी मालकीची असल्याने राजस्थान,गुजरात या राज्याप्रमाणे केंद्र शासनाने किल्ले राज्य शासनाच्या ताब्यात देऊन "अ" वर्गाचे राष्ट्रीय स्मारक घोषित करुन या किल्ल्याला ऐतिहासिक व जागतिक पातळीवरच्या पर्यटकांची वाढ होण्याच्यादृष्टीने राज्य शासनाकडून विशेष प्रयत्न करण्यात यावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१३) ''२५ ऑगस्ट,२००९ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे २००९-२०१० पासून सन २०११-१२ पर्यंतच्या ३ वर्षांच्या कालावधीत संबंधित मंत्रालयीन विभागाने तीन टप्प्यात निधी वितरीत करण्याबाबतची अंमलबजावणी न केल्याने कोकणातील चारही जिल्ह्यांना रु.५२३२ कोटी रुपये इतका निधी वितरीत न झाल्याने अनेक प्रकल्प मार्गी न लागणे, पाटबंधारे प्रकल्पांतर्गत गाळ काढण्याकरिता मशीन खरेदी, पर्यटन अशा विविध कामांकरीता निधी उपलब्ध होऊ न शकणे, परिणामी, कोकणाचा विकास खुंटला असून,या विकास कामांना गती मिळण्याच्या दृष्टीने विशेष कृती कार्यक्रम राबवून त्यात आवश्यक निधी तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी ही विधानपरिषद शासनास शिफारस करीत आहे.''

(१४) ''मुंबई-गोवा महामार्ग क्र.१७ चार पदरी होण्याकरिता सातत्याने होत असलेली मागणी, याबाबत दोन राज्य जोडणारा व पर्यटनदृष्टया महत्वाचा असणारा महामार्ग चारपदरी होण्यास विलंब होत असल्याने या महामार्गावर गेल्या दोन वर्षात मोठया प्रमाणावर झालेल्या अपघातात हजाराहून अधिक लोकांचे झालेले मृत्यू, अनेकजण जखमी होणे व कोटयावधी रुपयांचे वाहनांचे झालेले अपरिमित नुकसान, सदर अपघाताच्या घटना टाळण्यासाठी व या महामार्गाचे दोन राज्यांना जोडणारे व पर्यटनदृष्टया महत्व लक्षांत घेऊन हा महामार्ग चौपदरी करण्याच्यादृष्टीने शासनाने आवश्यक ती उपाययोजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१६) "सिंधुदूर्ग व कोल्हापूरला जोडणाऱ्या आंबोली घाटात असलेली अरुंद व वेडीवाकडी वळणे, रस्त्यांच्या बाजूने असलेली निकृष्ट दर्जाची संरक्षक भिंत, अनेक ठिकाणी कठडे नसणे, साईनबोर्डस् तसेच साईडपट्टयांचा अभाव असणे, संपूर्ण घाटाची झालेली दुरावस्था, परिणामत: या घाटात सातत्याने होत असलेले आपघात, यामुळे आतापर्यंत प्रचंड प्रमाणात झालेली व होत असलेली जिवीतहानी व वित्त हानी, या सर्व बाबी विचारात घेता आंबोली घाटाचे चौपदरीकरणाचे काम सत्वर हाती घेऊन या घाटात दोन नवीन पर्यायी मार्ग सुरु करण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

## श्री.संजय केळकर यांचा ठराव क्रमांक १७,१८,१९,२० व २१

(१७) '' कोकणात ओस पडत असलेल्या औद्योगिक वसाहती, वीज, पाणी, जमिनी यांची असलेली विपुलता, रेल्वेची साधने, वाहतुकीच्या सोयी उपलब्ध असूनही कोकणात उद्योजक न येणे, त्यामुळे वाढलेली प्रचंड बेरोजगारी लक्षात घेता कोकण उद्योग तसेच आय.टी.पार्क सुरु करण्याकरिता वीज, पाणी व इतर शासकीय सवलती देण्याची निर्माण झालेली गरज, या सवलती उद्योजकांना देऊन त्यांना कोकणाकडे आकृष्ट

करण्याकरीता शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१८) ''राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम स्पर्धात्मक परिक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत पध्दतीने योग्य प्रकारे पूर्वतयारी करुन घेण्यासाठी ठाणे शहरात जसे सी.डी.देशमुख इन्स्टिटयुट आहे त्याच धर्तीवर राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे ''

(१९) ''कोकण विभागातील किनारपट्टीवरील जिल्ह्यातील निसर्ग व भरपूर वनसंपत्ती, दळणवळणाची साधने, अतिप्राचीन किल्ले, मंदिरे व समुद्र किनारपट्टीवरील चौपाट्या या सर्व घटकांमुळे या भागात पर्यटक सतत भेटी देत असतात. तसेच गोवा राज्यात येणारे पर्यटक या भागात येत असतात परंतु पर्यटकांना तेथे पर्यटनाच्या दृष्टीने आवश्यक त्या सोयी-सवलती उपलब्ध होत नाही. परिणामी पर्यटकांची कमी झालेली संख्या लक्षात घेता कोकणाचा पर्यटनाच्या दृष्टीने सर्वांगिण विकास करण्यासाठी एक कालबध्द कार्यक्रम आखून त्यासाठी, पुरेशी आर्थिक तरतुद अर्थसंकल्पात करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(२०) ''ठाणे जिल्ह्यातील सातही महानगरपालिकांच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस असलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठया प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(२१) ''राज्यात विशेषत: ठाणे, रत्नागिरी, रायगड व सिंधुदूर्ग या जिल्ह्यांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी हजारो किलोमीटर लांबीचे बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटल्यामुळे समुद्राचे खारे पाणी "शेतजमिनीत शिरुन मालमत्तेचे, झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणांची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे मोठया प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरुपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने या चारही जिल्ह्यांच्या गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबध्द व कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.हुसेन दलवाई यांचा ठराव क्रमांक २२,२३,२४,२५ व २६**

(२२) '' मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७ या सुमारे ६०० कि.मी.लांबीच्या अंतरामध्ये असलेली अरुंद व वेडीवाकडी वळणे,असलेले असंख्य चढउतार कालबाह्य झालेले असंख्य अरुंद, कमकुवत व मोडकळीस आलेले पूल, अनेक ठिकाणी रस्त्यांच्या बाजूने संरक्षक भिंत,कठडे नसणे, साईनबोर्डस्,साईडपट्टयाचा अभाव तसेच संपूर्ण महामार्गाची झालेली दुरावस्था, परिणामत: या महामार्गावर सातत्याने होत असलेले अपघात, यामुळे आतापर्यंत प्रचंड प्रमाणात झालेली व होत असलेली मनुष्यहानी, तसेच,वित्त हानी, या सर्व बाबी विचारात घेता मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गाचे सहापदरीकरणाचे काम सत्वर हाती घेऊन या महामार्गावर असलेली सर्व वेडीवाकडी वळणे, चढउतार तसेच अरुंद, कमकुवत, मोडकळीस आलेल्या व त्यामुळे कालबाह्य झालेल्या पुलांच्या पुर्नबांधणी इ,कामाबाबत एक कालबध्द योजना आखून त्याची युध्दपातळीवर अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२३) ''राज्यात महिलांवरील अत्याचाऱ्यांचे वाढत असलेले प्रमाण, अल्पवयीन मुलींवरील बलात्कार व खून यांचे देखील वाढत चाललेले प्रमाण, परिणामत: महिलांमध्ये निमार्ण झालेली असुरक्षिततेची भावना, पोलीस यंत्रणाही असे गुन्हे रोखण्यात अपयशी ठरणे, याबाबी विचारात घेवून महिलांवर व अल्पवयीन मुलींवर होणाऱ्या अत्याचाऱ्यांना आळा बसावा म्हणून शासनाने ठोस उपाययोजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद करीत आहे. ''

(२४) ''राज्यात ७२० कि.मी.लांबीचा लाभलेला समुद्र किनारा लक्षात घेता शासनाने मुंबई, नवी मुंबईसह संपूर्ण कोकणात स्वस्त व प्रदुषण विरहित अशा सागरी जल वाहतुकीस प्राधान्य देणेबाबत तात्काळ निर्णय घेऊन कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरेने अंमलबजावणी करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२५) ''राज्यात विशेषत: कोकणातील सर्व गावे बारमाही वाहतूकीस योग्य होण्यासाठी सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पाहणी करुन आवश्यक असेल तेथे नद्या, नाले व मो-या यांचेवर पूल बांधण्याची धडक योजना अंमलात आणावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(२६) ''राज्यातील वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ.बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक योजना राबविण्यात यावा,अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

## श्री.हेमंत टकले यांचा ठराव क्रमांक २७

(२७) '' भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे "चैत्यभूमी" दादर, मुंबई येथे स्मारक आहे. तसेच डॉ.आंबेडकर यांचे वास्तव्य दादर येथे हिंदू कॉलनीत राजगृह येथे होते. आताही राजगृहात डॉ.आंबेडकरांच्या वापरातील वस्तु ठेवण्यात आल्या आहेत. दिनांक १४ एप्रिल व ६ डिसेंबर या दिवशी या माहामानवाला अभिवादन करण्यासाठी देशातील लाखो अनुयायी येत असतात. या महामानवाचे नाव चिरंतर स्मरणात रहावे यासाठी दादर रेल्वे स्थानकाचे "चैत्यभूमी" रेल्वे स्थानक असे नामकरण करावे अशी राज्यातील सर्व अनुयायी यांची फार पूर्वीपासून असलेली मागणी विचारात घेऊन दादर रेल्वे स्थानकाला "चैत्यभूमी" रेल्वेस्थानक असे नामकरण करण्याबाबत आग्रही भूमिका केंद्र शासनाकडे धरावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

## श्री.जयंत पाटील यांचा ठराव क्रमांक २८,२९,३०,३१ व ३२

(२८) '' राज्यातील जीवनावश्यक वस्तुंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करुन जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करुन स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२९) '' राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याबाबत तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी-सुविधा

उपलब्ध करुन देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३०) ''कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी तसेच मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने त्याचप्रमाणे शहरीकरणाच्या विकासाच्या दृष्टीने पाण्याची निर्माण होत असलेली समस्या सोडविण्यासाठी कोयना धरणाचे विजनिर्मितीनंतर वशिष्ठ नदीच्या (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) पात्रातून वाया जाणारे पाणी कोकणातील जिल्ह्यांना तसेच मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिकांच्या पाण्याची समस्या/दुष्काळ दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने चिपळूण तालुक्यातील वशिष्ठ नदीतील पाणी परशुराम घाटाच्या पायथ्यापासून उचलून (लिफ्टिंग) निसर्गाच्या गुरत्वाकर्षणाच्या शक्तीने पूर्ण कोकण विभागाला पुरविण्याकरिता शासनाने एक खास कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरेने युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३१) ''राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणा-या ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही, तसेच आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(३२) '' राज्यात रस्ते अपघातात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, अपघातग्रस्तांना वेळीच योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई- गोवा (वडखळ नाका) नाशिक शिर्डी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या जास्त वाहनाचीं वर्दळ असलेल्या द्रुतगती मार्गांवर शासनाने ट्रॉमा केअर सेंटर सुरू करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

## श्री.विजय सावंत यांचा ठराव क्रमांक ३३,३४,३५,३६ व ३७

(३३) '' भारताचे व वेंगुर्ल्याचे सुपुत्र डॉ.द्वारकानाथ कोटणीस यांची चिरंतन स्मृती जपण्यासाठी चीनमध्ये एका रुग्णालयास त्यांचे नाव देण्यात आले आहे; मात्र भारतात त्यांचे कुठेही स्मारक नाही, सन २००९-१० हे डॉ.कोटणीसांचे जन्म शताब्दी वर्ष असून देखील वेंगुर्ला येथे अद्यापपावेतो त्यांचे स्मारक उभारण्यात आलेले नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेता डॉ.कोटणीसांचे वेंगुर्ला (जिल्हा सिंधुदूर्ग) येथे स्मारक उभारण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३४) ''कोकण रेल्वे मार्गावरील प्रवाशांची वाढती संख्या विचारात घेता हा मार्ग दुपदरी (सेंकड ट्रॅक) करण्याची आवश्यकता, तसेच या रेल्वेमार्गावरील प्रत्येक रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सोयीसाठी किमान पत्र्याची कायमस्वरुपी शेड उभारणे, सुलभ शौचालये व अन्य सुविधाअभावी महिला प्रवाशांची होत असलेली गैरसोय लक्षात घेंता तेथे सुलभ शौचालय व अन्य अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद राज्य शासनास करीत आहे. ''

(३५) ''राज्यात प्रतिवर्षी ग्रामीण व शहरी भागांना कायमस्वरुपी भेडसावणारी पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या प्रभावीरित्या सुटण्याकरिता धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठयांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक विशेष कार्यक्रम आखून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(३६) '' राज्यात अनेक ठिकाणी धरणासारख्या प्रकल्पांमध्यें ज्यांची घरे व जमिनी गेल्या आहेत, अशा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची कामे विनाविलंब व निश्चितपणे पूर्ण होऊ शकतील, या दृष्टीने कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३७) '' कोकणातील सागरी किनारपट्टीलगतच्या गावांना समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून होणाऱ्या नुकसानीपासून वाचविण्यासाठी तज्ञांची एक समिती नेमून सागरी अतिक्रमण बचावासाठी एक मास्टर प्लॅन तयार करुन त्याची युध्द पातळीवर अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

## श्री.जयवंतराव जाधव यांचा ठराव क्रमांक ३८, ३९, ४०

(३८) ''पुणे शहर हे विद्येचे माहेरघर असून याच पुणे शहरामध्ये थोर, कृतीशील समाजसुधारक व युगप्रवर्तक महात्मा ज्योतिराव फुले यांनी सर्वप्रथम शिक्षणाची चळवळ सुरु करुन स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे खुली करुन दिली. सर्वसामान्यांबरोबरच महिलांना शिक्षणाचा हक्क मिळवून देण्याचे महाप्रतापी कार्य महात्मा फुले यांनी पुणे शहरातून सर्वप्रथम सुरु केले. त्यामुळे या महामानवाचे शिक्षणाबाबतचे कार्य चिरंतन स्मरणात रहावे यासाठी पुरोगामी महाराष्ट्रातील पुणे विद्यापीठामध्ये ह्या आद्यप्रवर्तकाच्या पूर्णकृती पुतळयाचे अनावरण करुन पुणे विद्यापीठास "महात्मा ज्योतिराव फुले पुणे विद्यापीठ" असे नाव देण्यात यावे. अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३९) "उत्तर महाराष्ट्रातील नाशिक विभागात विकासाचा अनुशेष मोठया प्रमाणात शिल्लक आहेत. या विभागात सिंचनाच्या अपु-या सोयी असल्यामुळे या भागातील शेतक-यांना वर्षानुवर्षे नापिकी, टंचाई व दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. यासाठी नाशिक विभागाचा अनुशेष दूर करण्यासाठी व शीघ्र गतीने विकास घडवून आणण्याकरिता नाशिक विभागासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याच्यादृष्टिने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद क्रमांक ३७१ (२) मध्ये सुधारणा करण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४०) '' ग्रामीण भागातील पर्यावरणाचा विकास करण्यासाठी "पर्यावरण संतुलीत समृध्द ग्राम योजना" या शासनाच्या महत्वाकांक्षी योजनेमध्ये सहभाग घेतलेल्या गावांमध्ये ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडी असणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांवर बंदी करुन त्याची १ एप्रिल,२०११ पासून राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत सन २०१० मध्ये राज्यातील ग्रामसभांमध्ये ठराव करण्यात आलेले आहेत. तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने प्लॅस्टिक कचऱ्यासंबंधी नियम केला असून या नियमाप्रमाणे ४० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर व उत्पादनावर बंदी घालण्यात आलेली आहे. मात्र त्यांची अंमलबजावणी झाल्याचे दिसून येत नाही. पर्यावरण रक्षणासाठी प्लास्टिक पिशव्या तयार करणाऱ्या उत्पादकांवर बंदी घालण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा व राज्यामध्ये प्लास्टिकच्या वापरावर कडक निर्बंध घालून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

## श्री.अनिल भोसले यांचा ठराव क्रमांक ४३,४४,४५,४६ व ४७

(४३) ''पुणे, पिंपरी-चिंचवड व पुणे ग्रामीण भागाचे वेगाने होणारे शहरीकरण, त्या मानाने या भागात रस्त्यांचा विकास न झाल्याने वाहतुकीची होत असलेली प्रचंड कोंडी, सुलभ व जलद वाहतुकीसाठी तेथे सोईसुविधांचा असलेला अभाव, या परिस्थितीवर तोडगा निघावा यासाठी पुणे-पिंपरी- चिंचवड व पुणे शहराच्या आसपासच्या भागाच्या विकासासाठी मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर पुणे विकास प्राधिकरण नेमून त्याकरिता शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(४४) ''राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(४५) ''राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याबाबत तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४६) ''राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व इतर अनेक प्रकराचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील तसेच नदीकाठच्या गावातील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून त्यामुळे रहिवाश्यांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवाच्या जिविकेच्या साधनांवर होणारा विपरित परिणाम लक्षांत घेता राज्यांतील जलप्रदूषण समस्येवर उपाय शोधून जलप्रदूषणास प्रभाविरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४७) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, तसेच अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याची नितांत आवश्यकता विचारात घेवून योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

## डॉ.निलम गोऱ्हे यांचा ठराव क्रमांक ५२

(५२) ''राज्यात रस्त्यावरील वाहनांच्या संख्येत झालेली प्रचंड वाढ, त्यामानाने रस्ते अरुंद तसेच वाहतुक सिग्नल योग्य नसल्याने व राज्यातील द्रुतगती मार्गाची योग्य ती देखभाल होत नसल्याने राज्यात वाहनांच्या अपघातात झालेली लक्षणीय वाढ, सातत्याने होणाऱ्या रस्त्यांवरील अपघातांमुळे होणारी जिवित व वित्तहानी लक्षात घेता राज्यातील रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाय सुचविण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

## श्री.रमेश शेंडगे यांचा ठराव क्रमांक ५३,५४,५५,५६ व ५७

(५३) ''राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, तसेच अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याची नितांत आवश्यकता विचारात घेवून योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

(५४) ''राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने हया विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(५५) ''राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५६) ''राज्यातील बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५७) ''भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे "चैत्यभूमी" दादर,मुंबई येथे स्मारक आहे. तसेच डॉ.आंबेडकर यांचे वास्तव्य दादर येथे हिंदू कॉलनीत राजगृह येथे होते. आताही राजगृहात डॉ.आंबेडकरांच्या वापरातील वस्तु ठेवण्यात आल्या आहेत. दिनांक १४ एप्रिल व ६ डिसेंबर या दिवशी या माहामानवाला अभिवादन करण्यासाठी देशातील लाखो अनुयायी येत असतात. या महामानवाचे नाव चिरंतर स्मरणात रहावे यासाठी दादर रेल्वे स्थानकाचे "चैत्यभूमी" रेल्वे स्थानक असे नामकरण करावे अशी राज्यातील सर्व अनुयायी यांची फार पूर्वीपासून असलेली मागणी विचारात घेऊन दादर रेल्वे स्थानकाला "चैत्यभूमी" रेल्वेस्थानक असे नामकरण करण्याबाबत आग्रही भूमिका केंद्र शासनाकडे धरावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

## श्री.विक्रम काळे यांचा ठराव क्रमांक ५८,५९,६०,६१ व ६२

(५८) ''राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणा-या ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही, तसेच आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(५९) ''राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६०) ''शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६१)  '' राज्यातील ग्रामीण भागातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संख्या वाढविण्यापेक्षा उपलब्ध असलेल्या शाळांमधून गुणात्मक व दर्जेदार शिक्षण विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी ठोस कृती कार्यक्रम व त्याची कालबध्द अंमलबजावणी  करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६२)  '' शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा वा महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा वा महाविद्यालयांमार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

## श्रीमती अलका देसाई यांचा ठराव क्रमांक  ६३,६४,६५,६६

(६३)   ''राज्यातील पोलिसांना २४ तासाहून अधिक तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे. तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे, अनेक पोलिसांना भाडयाच्याच घरात राहावे लागत आहे. शासनाकडून देण्यात आलेल्या शासकीय निवासाची अत्यंत दुरावस्था आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न, यामुळे त्यांच्यात निर्माण होत असलेले तणावाचे वातावरण, परिणामी त्यांच्यावर मानसिक ताण वाढत असून त्यांच्यात आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. म्हणून पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होऊन त्यांच्या कामाचे तास, साप्ताहिक सुटी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरुपी तोंडगा काढण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(६४)   ''राज्यात विना अनुदानित अभियांत्रिकी, वैद्यकीय महाविद्यालयांना फी वाढीचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने विनाअनुदानित अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांच्या संचालकांनी फी मध्ये केलेली असमर्थनीय वाढ, सदर फी वाढीमुळे अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांमधून शिक्षण घेणे गरीब, हुशार व होतकरु विद्यार्थ्यांच्या आर्थिक कुवतीबाहेरचे होणे, परिणामी त्यांना अशा महत्वाच्या शिक्षणाला मुकावे लागणे, ही वस्तुस्थिती लक्षात घेता अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयामधील फी भरण्यासाठी अशा हुशार व गुणवान विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत शासनाने आर्थिक सहाय्य कर्जरुपाने उपलब्ध करुन द्यावे व शिक्षण पूर्ण झाल्यावर सदरहू कर्ज हप्त्याहप्त्याने वसूल करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(६५)   ''वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शासनातर्फे व महानगरपालिकांतर्फे रुग्णवाहिका सुरु न करणे, तसेच अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा आकस्मिक दुखणे, यामुळे सर्वसामान्य लोकांना रुग्णवाहिका सेवा तात्काळ उपलब्ध न होणे, त्यासाठी सामाजिक किंवा राजकीय संस्थांनी विभागा-विभागातून जनसेवेच्या उदात्त हेतूने रुग्णवाहिका सुरु केल्या आहेत, अशा  रुग्णवाहिकांसाठी शासनातर्फे आर्थिक अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६६)   '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण  व रोजगारांअभावी त्यांच्यात निर्माण  झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

## श्रीमती दिप्ती चवधरी यांचा ठराव क्रमांक  ६७,६८,६९,७० व ७१

(६७)  '' राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा दिवसेंदिवस खालावत चाललेला दर्जा लक्षात घेता या प्रकरणी आमुलाग्र सुधारणा करण्यासाठी शासनाने एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६८)  '' राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत चाललेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्यादृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६९)  '' जीवनावश्यक वस्तुंचे  कडाडलेले भाव लक्षात घेता राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानांतून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचा नियमित पुरवठा होण्याचे दृष्टीने सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी  शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७०)  '' राज्यातील सर्व गावे बारमाही वाहतूकीस योग्य व्हावीत याकरिता सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पाहणी करुन आवश्यक असेल तेथे नद्या, नाले व मोऱ्या यांचेवर पूल बांधण्याची धडक योजना अंमलात आणावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७१)  '' राज्यात रस्त्यावरील वाहनांच्या संख्येत झालेली प्रचंड वाढ, त्यामानाने रस्ते अरुंद  तसेच वाहतुक सिग्नल योग्य नसल्याने व राज्यातील द्रुतगती मार्गाची योग्य ती देखभाल होत नसल्याने राज्यात वाहनांच्या अपघातात झालेली लक्षणीय वाढ, रस्त्यावरील अपघातामुळे होणारी जिवित व वित्तहानी लक्षात घेता राज्यातील रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाय सुचविण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याबाबत ही विधानपरिषद शासनास शिफारस करीत आहे. ''

## श्री.चंद्रकांत पाटील यांचा ठराव क्रमांक  ७२,७३,७४,७५ व ७६

(७२)  '' राज्यातील दूरदर्शन तसेच  केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे  होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी  यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७३)  ''राज्यातील जीवनावश्यक वस्तुंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करुन जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करुन स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.  ''

(७४)  '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण  व रोजगारांअभावी त्यांच्यात निर्माण  झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७५)  '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य

प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, तसेच अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याची नितांत आवश्यकता विचारात घेवून योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

(७६) '' राष्ट्रीय स्तरावरील भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा राज्यस्तरावरील वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश परिक्षा, लोकसेवा आयोग व तत्सम स्पर्धात्मक परिक्षांमध्ये राष्ट्रीय स्तरावर उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने उमेदवारांची योग्य प्रकारे व अद्ययावत पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून सदर अभ्यासक्रम सुरु करुन १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

## प्रा.सुरेश नवले यांचा ठराव क्रमांक ७७,७८,७९,८०

(७७) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७८) '' राज्यातील ग्रामीण भागातील राहणीमानाचा दर्जा उंचविण्यासाठी राजीव गाधी घरकुल योजना राबविण्यात येत असून या योजनेला बँकाँमार्फत योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने शासनाच्या या समाजोपयोगी योजनेला खीळ बसण्याची शक्यता विचारात घेऊन ही योजना लाभार्थ्यांकडून एक पैसा न घेता १००% राज्य शासनामार्फत राबविण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७९) '' राज्यातील बांधकामासाठी लागणाऱ्या विटा,खडी,रेती,सिमेंट व स्टील इत्यादी बांधकाम साहित्याच्या अमर्यादीत वाढलेल्या किंमती व रेतीच्या अचानक उद्भवलेल्या तुटवडयामुळे राज्यभरातील इमारती, रस्ते, शासकीय कार्यालयांची बांधकामे, इत्यादी विकास कामे ठप्प झाली आहेत. त्यामुळे राज्यातील बांधकाम व्यवसायासाठी लागणाऱ्या साहित्यांची नियंत्रित दरात मुबलक प्रमाणात उपलब्धता व्हावी यासाठी अभ्यास गट नेमून कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८०) '' राष्ट्रीय स्तरावरील भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा राज्यस्तरावरील वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश परिक्षा, लोकसेवा आयोग व तत्सम स्पर्धात्मक परिक्षांमध्ये राष्ट्रीय स्तरावर उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने उमेदवारांची योग्य प्रकारे व अद्ययावत पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून सदर अभ्यासक्रम सुरु करुन १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

## श्री.रामनाथ मोते यांचा ठराव क्रमांक ८४,८५

(८४) ''राज्यातील सर्व धर्मादाय शैक्षणिक संस्थांचे प्रशासन प्रभावीपणे होण्यासाठी सदर संस्थांचा कारभार पहाण्यासाठी स्वतंत्र धर्मादाय आयुक्तालयाची निर्मीती करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८५) '' राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त भटक्या जाती/जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग, आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीय मुला मुलींना अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित संस्थांमध्ये पदव्युत्तर स्तरापर्यंत नि:शुल्क शिक्षण देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

## श्री.संदिप बाजोरिया यांचा ठराव क्रमांक ८६,८७,९२

(८६) ''राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व इतर अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील तसेच नदीकाठच्या गावातील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषत: कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून त्यामुळे रहिवाश्यांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवाच्या जिविकेच्या साधानंवर होणारा विपरित परिणाम लक्षात घेता राज्यांतील जलप्रदूषण समस्येवर उपाय शोधून जलप्रदूषणास प्रभाविरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(८७) ''राज्यातील विशेषत: विदर्भ व कोकणात होत असलेले धानाचे उत्पन्न्, बऱ्याच वेळा पावसाअभावी धान उत्पादनात घट होऊन धानाला योग्य भाव न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांनी उत्पादनावर केलेला खर्चही त्यांना न मिळणे, त्यामुळे शेतकऱ्यांची होत असलेली उपासमार, उत्पादन खर्चावर आधारित असे धानाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे.''

(९२) ''विदर्भात ओस पडलेल्या औद्योगिक वसाहती, वीज, पाणी आणि जमिनी यांची विपुलता असूनही विदर्भाकडे उद्योजक न येणे, त्यामुळे वाढलेली प्रचंड बेरोजगारी, विदर्भातील उद्योजकांना, वीज दरामध्ये सवलत न मिळणे, प्रत्यक्षात मुंबई या आर्थिक राजधानीपासून दूर ठिकाणी उद्योग उभारण्याकरिता उद्योजकांना सवलती देण्याची आवश्यकता विचारात घेता विदर्भातील उद्योजकांना वीज दरामध्ये किमान १५ टक्के सवलत देण्याबाबत शासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

## डॉ.सुधीर तांबे यांचा ठराव क्रमांक ८९,९०,९१

(८९) '' राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोग शाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विना अनुदान तत्त्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९०) '' राज्यातील लोकसंख्येत अपंगांचे ५ टक्क्याहून अधिक प्रमाण आहे. यात बरेच मूकबधीर अपंग आहेत. या अपंगांना योग्य शिक्षण मिळत नाही. यामुळे अपंग शिक्षणापासून वंचित राहतात त्यामुळे या अपंगांना भविष्यात विशेष असे स्थान मिळत नाही. त्याचप्रमाणे ते स्वत:चा उदरनिर्वाह करण्यासाठी असमर्थ ठरतात. अपंग शिक्षणापासून वंचित राहू नयेत व भविष्यात त्यांचा विकास व्हावा म्हणून शासनाने त्यांच्यासाठी विशेष योजना आखावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९१) '' राज्यातील शेतकऱ्यांवर नेहमीच दुष्काळाची छाया पसरलेली असते. कधी ओला दुष्काळ तर कधी सुका दुष्काळ, ही परिस्थिती शेतकऱ्यांवर नेहमीच येत असते. यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होतात व यातून त्यांच्या आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सध्या गोवा सरकारने शेतकऱ्यांना पेन्शन योजना सुरु केल्या आहेत.त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनानेही राज्यातील दारिद्रय रेषेखालील शेतकऱ्यांना पेन्शन योजना सुरु करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

## श्री.सतीश चव्हाण यांचा ठराव क्रमांक ९३,९४,९५,९६

(९३) '' राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्यायावत पध्दतीने योग्य प्रकारे पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९४) '' राज्यात सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी करुन सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची पुरेशी संधी प्राप्त होत नाही. दिवसेंदिवस वाढती महागाई विचारात घेता बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होणे, आवश्यक आहे. तथापि, सेवायोजन कार्यालयाकडून १९८५ पासून नोकरीच्या मुलाखतीसाठी बोलावणे (कॉल) येत नाही म्हणून पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढे सतत ३ वर्ष बेरोजगार राहणाऱ्या पदवीधर उमेदवारांना आर्थिक मदत म्हणून प्रतिमहा रुपये १५००/- बेकार भत्ता म्हणून देण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९५) '' राज्यातील खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पीछेहाट लक्षात घेता क्रीडाक्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याकरीता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९६) '' केंद्र सरकारने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्राम सडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्य शासनाने राज्यात पांदी रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजनांचा राज्य शासनाच्या योजनेत समाविष्ट करावा अशी ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

## श्रीमती शोभाताई फडणवीस यांचा ठराव क्रमांक ९८,९९,१००,१०१ व १०२

(९८) '' राज्यातील कृषी पंपाचे एकूण २ लाख ८० हजार विज कनेक्शन द्यावयाचे असून त्यापैकी केवळ १ लाख ३० हजार ७३७ विज कनेक्शन दिले जाणे, त्यामुळे राज्यातील आवश्यक असलेल्या अर्ध्याहून अधिक कृषी पंपाचे वीज कनेक्शन दिले न गेल्यामुळे शेतकरी सिंचनापासून वंचित राहून शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होणे, ट्रान्सफॉर्मरवर ज्यादा कनेक्शन असल्यामुळे ट्रान्सफार्मर उडण्याचे घडत असलेले प्रकार ह्याकरिता ज्यादा ट्रान्सफार्मर देण्याची गरज, अर्थसंकल्पीय अधिवेशनात २ लाख् ८० हजार कृषी पंपांना वीज देण्याचे दिलेले आश्वासन विचारात घेवून खरीब व रब्बी पिक घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना वीज

कनेक्शन देण्याबाबत शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९९) ''राज्यात महिलांवरील अत्याचाऱ्यांचे वाढत असलेले प्रमाण, अल्पवयीन मुलींवरील बलात्कार व खून यांचे देखील वाढत चाललेले प्रमाण, परिणामतः महिलांमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना, पोलीस यंत्रणाही असे गुन्हे रोखण्यात अपयशी ठरणे, याबाबी विचारात घेवून महिलांवर व अल्पवयीन मुलींवर होणाऱ्या अत्याचाऱ्यांना आळा बसावा म्हणून शासनाने ठोस उपाययोजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद करीत आहे.''

(१००) ''राज्यात भृण हत्येचे प्रमाण सन २००० या वर्षापेक्षा जास्त वाढल्याचे सन २०१० च्या ऑक्टोबर महिन्याच्या अहवाला वरुन सिध्द होणे, ऑक्टोबर २०१० मध्ये १००० पुरुषांमागे ८६० स्त्रिया असे प्रमाण असल्याचे प्रसिध्द होणे, त्याच बरोबर मुलींच्या मृत्यू दरातही ह्या दशकात प्रचंड वाढ होणे, ह्यावर बंधन घालण्याकरीता गर्भजल परिक्षणावर बंधन आणून भृण हत्या थांबविण्याकरीता असलेल्या कायद्यात कडक सुधारणा करण्याची व त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याची आवश्यकता ह्यावर शासनाने उपाययोजना करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१०१) ''राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारांअभावी त्यांच्यांत निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या पारिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तींला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१०२) ''राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

**श्रीमती उषाताई दराडे यांचा ठराव क्रमांक १०३,१०४,१०५,१०७**

(१०३) ''शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील ऊसतोडणी कामगारांच्या कुटुंबातील पाल्यांना शाळा महाविद्यालयांमार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे.''

(१०४) ''राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१०५) ''राज्यातील इतर विभागांपेक्षा मराठवाडा तुलनात्मकदृष्टया मागासलेला असल्याने मराठवाडयाच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक असलेले १) लातूर ते मिरज, २) पूर्णा ते अकोला, ३) मुदखेड ते निजामाबाद, सिकंदराबाद, ४) रोटेगाव ते पुणतांबा, ५) परळी-बीड-नगर हे नवीन रेल्वे मार्ग विकसित करण्यासाठी नांदेड ते मनमाड रेल्वे मार्ग दुपदरी (सेकंड ट्रॅक) करणे तसेच अपूर्ण असलेले रेल्वे मार्ग पूर्ण होण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१०७) ''महापुरुष राजर्शी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ.आंबेडकर, सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर, महर्षी कर्वे, आनंदीबाई जोशी, छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, जिजामाता इत्यादी महाराष्ट्र राज्यातील समाजसुधारक व ऐतिहासिक महापुरुषांची चरित्रे मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत छापून माफक दरात सर्व सामान्य जनतेला मिळावा यासाठी शासनाने या पुस्तकांच्या छपाई खर्चासाठी स्वतंत्रपणे २ कोटींचा निधी साहित्य सांस्कृतिक मंडळाला दयावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

## श्री.दिपकराव साळुंखे यांचा ठराव क्रमांक १०८,१०९,११०,१११ व ११२

(१०८) ''राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत चाललेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठयांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा, व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१०९) ''राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणा-या ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही, तसेच आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(११०) ''राज्यातील पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देवून त्याठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व त्यायोगे तेथील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी तसेच यासर्व पर्यटन स्थळांचे महत्व कायम राखण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१११) ''राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व यांच्यात रोजगारांअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षांत घेता बेरोजगारी समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(११२) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने हया विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

## श्री.विनोद तावडे यांचा ठराव क्रमांक ११५,११६

(११५) '' जगभरात साधारपणे १५ टक्के दाम्पत्यांना नैसर्गिकरित्या स्वत:चे मूल होऊ शकत नाही. प्रगत तंत्रज्ञानाने यापैकी ८५ टक्के दाम्पत्यांना दिलासा दिलेला असता तरी उर्वरित १५ टक्के दाम्पत्यांना पालकत्वाच्या आनंदास मुकावे लागते. आपल्या समाजात व्यंधत्व हा दोष मानला जाऊन या दाम्पत्यांना सामाजिक अडचणींना सामना करावा लागतो त्याच वेळेस मूल दत्तक घेण्यासंदर्भातही सामान्य लोकांना पुरेशी माहिती नसते वा त्यांच्या मनात अनेक गैरसमज असतात. तसेच आवश्यक पाठिंबा नसल्याने अनेक व्यक्ती मूल दत्तक घेण्यास धजावत नाहीत. तर दुसरीकडे अनेक मुले-माता पित्याच्या छत्राशिवाय अनाथ

आयुष्य जगत असतात. या सर्व बाबींचा सांगोपांग विचार करुन शासनाने हेल्पलाईनच्या माध्यमातून पालकांना आपल्या शंकांचे निरसन करण्याची सोय उपलब्ध करावी, प्रसार माध्यमांच्या सहाय्याने समाजात जागरुकता निर्माण करावी, मूल दत्तक घेतलेल्या पालकांना त्यांच्या अनुभवांची देवाणघेवाण करण्यासाठी व्यासपीठ निर्माण करावे, अनाथ मूल दत्तक घेण्यास प्रोत्साहन देणाऱ्या योजना शासनाने राबवाव्यात,अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(११६) '' मृत्यू पश्चात अवयव दान व देह दान करण्यास सर्वच धर्मांचा पाठिंबा असतांनाही माहितीचा अभाव, गैरसमज, आवश्यक सोयीं सहज उपलब्ध नसणे यामुळे लोक अवयव दान वा देह दान करण्यास राजी होत नाही. ब्रेन डेथ झालेल्या व्यक्तींचेच अवयव दान करणे शक्य असते. हदय, फुफ्फुस, त्वचा यासह ८ अवयवांचे प्रत्यारोपण शक्य असून एका व्यक्तीच्य अवयव दानातून अनेक व्यक्तींचे प्राण वाचू शकतात, अवयव दानानंतर मृत शरीरावर धार्मिक संस्कार करणेही शक्य असते. तर देह दानामुळे वैद्यकीय संशोधनास हात भार लागत असतो. या सर्व बाबींचा सातत्याने विचार करुन शासनाने विविध उपक्रम राबवून व सोयी सुविधा उपलब्ध करवून मृत्यु पश्चात अवयव व देह दानास प्रोत्साहन द्यावे, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

## श्री.राम पंडागळे यांचा ठराव क्रमांक ११८

(११८) '' भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे "चैत्यभूमी" दादर,मुंबई येथे स्मारक आहे. तसेच डॉ.आंबेडकर यांचे वास्तव्य दादर येथे हिंदू कॉलनीत राजगृह येथे होते. आताही राजगृहात डॉ.आंबेडकरांच्या वापरातील वस्तु ठेवण्यात आल्या आहेत. दिनांक १४ एप्रिल व ६ डिसेंबर या दिवशी या माहामानवाला अभिवादन करण्यासाठी देशातील लाखो अनुयायी येत असतात. या महामानवाचे नाव चिरंतर स्मरणात रहावे यासाठी दादर रेल्वे स्थानकाचे "चैत्यभूमी" रेल्वे स्थानक असे नामकरण करावे अशी राज्यातील सर्व अनुयायी यांची फार पूर्वीपासून असलेली मागणी विचारात घेऊन दादर रेल्वे स्थानकाला "चैत्यभूमी" रेल्वेस्थानक असे नामकरण करण्याबाबत आग्रही भूमिका केंद्र शासनाकडे धरावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

## श्री.धनंजय मुंडे यांचा ठराव क्रमांक १२०,१२२,१२३

(१२०) ''राज्यातील ऊसतोड कामगार ऊस तोडणीसाठी वर्षातील आठ महिने घराबाहेर राहत असल्यामुळे व त्यांच्या सोबत त्यांचे संपूर्ण कुटुंबही ऊस तोडणीसाठी स्थंलातरित होत असल्यामुळे त्यांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे, या ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्यातील प्रत्येक तालुक्यात ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी निवासी शाळा सुरू कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१२२) ''राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकासारख्या आर्थिक संस्थाकडून येणाऱ्या अडचणी, याबाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, सुशिक्षित बेरोजगारांना पुन्हा भत्ता सुरू करावा, रोजगारासाठी भागभांडवलाची सोय करावी व बंदी घालण्यात आलेली नोकर भरती पुन्हा सुरू करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१२३) ''राज्यात भृण हत्येचे प्रमाण सन २००० या वर्षापेक्षा जास्त वाढल्याचे सन २०१० च्या ऑक्टोबर महिन्याच्या अहवालावरून सिद्ध होणे, ऑक्टोबर २०१० मध्ये १००० पुरूषांमागे ८६० स्त्रिया असे प्रमाण असल्याचे प्रसिद्ध होणे, त्याच बरोबर मुलींच्या मृत्यू दरातही ह्या दशकात प्रचंड वाढ होणे, ह्यावर बंधन घालण्याकरिता गर्भजल परिक्षणावर बंधन आणून भृण हत्या थांबविण्याकरिता असलेल्या कायद्यात कडक सुधारणा करण्याची व त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, ह्यावर शासनाने उपाययोजना करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

**एकोणीस** : सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी स्वतंत्रपणे वितरीत करण्यात आली आहे.)

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २० जुलै, २०११.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानपरिषद.